
स्वदुग्धे सदा पोशिते जी जगाला ।
स्वपुत्रास दे जी कृषी चालवाया ।
नमस्कार त्या दिव्य गो देवतेला ।

वसुबारस

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



• वर्ष : ०४ • अंक : ०५५ • पुणे • गुरुवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313



शासनाच्या विकासकामांची माहिती घराघरांत

3




रोहित शर्मासोबत प्रियजनांना द्या खास दिवाळी शुभेच्छा!

4

'ट्रम्प पर्व संपले'

डेमोक्रॅटिक दिवाळी : ट्रम्प यांना मतदारांचा झटका; दोन्ही सभागृहांवर डेमोक्रॅटिक पक्षाचा ताबा



मुंबई (दै. आरंभ पर्व)

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला धूळ चारत डेमोक्रॅटिक पक्षाने मध्यावधी निवडणुकीद्वारे अमेरिकी काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांमध्ये वर्चस्व स्थापित केले. इराण युद्ध, इस्रायलला मदत यांसह विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय धोरणांत एककल्ली हुकमत गाजवू पाहणाऱ्या ट्रम्प यांना हा सर्वांत मोठा धक्का मानला जातो. ट्रम्प यांनी 'मीच उभा आहे, असे समजून मतदान करा' असे जेथे आवाहन केले, त्या पारंपरिक रिपब्लिकन राज्यांतही डेमॉक्रॅटिक पक्षाने विजय मिळवला. या निकालाने अमेरिकेतील लोकशाहीवादी नागरिक आनंदाची दिवाळी साजरी करीत आहेत. ट्रम्प यांच्या या दारुण पराभवाचे आंतरराष्ट्रीय राजकारणावरही परिणाम दिसून येतील, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी हा निकाल मान्य करतानाच, 'मी निवडणुकीला उभा असतो, तर आमचा दणदणीत विजय झाला असता' अशी पुस्तीही जोडली. राष्ट्राध्यक्षांच्या कामगिरीवरील सार्वमत म्हणून पाहिल्या जाणाऱ्या या मध्यावधी निवडणुकीतील रिपब्लिकन पक्षाचा पराभव अभूतपूर्व असा आहे. जॉर्जिया, टेक्सास, आयोवा, ओहायो या राज्यांतील 'गव्हर्नर'पदाच्या निवडणुकीत अनेक वर्षांपासूनचे रिपब्लिकन वर्चस्व मतदारांनी मोडीत काढले. ट्रम्प यांच्या धोरणांविरोधात जनतेचा संताप असे या निकालाकडे पाहिले जात आहे. त्यांच्या पक्षातील एका नेत्यानेच या संदर्भात 'ट्रम्प पर्व संपले' अशी प्रतिक्रिया दिली. प्रतिनिधिगृहाचे संख्याबळ ४३५ असून बहुमतासाठी २१८ जागांवर विजय आवश्यक आहे. सेनेट हे लोअर हाऊसपेक्षा अधिक शक्तिशाली सभागृह आहे. प्रतिनिधिगृहाच्या सदस्यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा असतो, तर सेनेटरचा कार्यकाळ सहा वर्षांचा असतो. ५० राज्यांमधून १०० सेनेटर निवडले जातात, त्यामुळे प्रत्येक सेनेटर संपूर्ण राज्याचे प्रतिनिधित्व करत असल्याचे मानले जाते. फेडरल न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, कॅबिनेट सेक्रेटरी यांसारख्या अध्यक्षांनी केलेल्या महत्त्वाच्या नियुक्त्या स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार सेनेटकडे असतो.

> मी निवडणूक लढवत नव्हतो, अन्यथा आमचा दणदणीत विजय झाला असता. डेमोक्रॅटिक पक्षाचे अभिनंदन. मी हा निकाल स्वीकारतो. आम्ही डेमोक्रॅटिक पक्षाबरोबर काम करू.
> **- डोनाल्ड ट्रम्प, अध्यक्ष, अमेरिका**



पायल झांबरे आत्महत्याप्रकरणी सासू-सासऱ्यांना अटक

• सात नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी

पुणे (दै. आरंभ पर्व)

माहेरहून पैसे आणण्याची मागणी करून अभियंता पायल झांबरे हिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सासू-सासऱ्यांना स्वारगेट पोलिसांनी अटक केली. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी स्नेहा साकळे यांनी दोघांना शनिवारपर्यंत (७ नोव्हेंबर) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. पायल अक्षय झांबरे (वय ३४) हिने २ नोव्हेंबर रोजी मुकुंदनगर भागातील घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी पती अक्षय अरविंद झांबरे (वय ३५, रा. मंगलमय इमारत, झांबरे पॅलेस जवळ, मुकुंदनगर), सासू मंगल झांबरे (वय ५८), सासरे अरविंद झांबरे (वय ६५) आणि नणंद अक्षता झांबरे-निमन (वय ३०) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी पायलचा पती अक्षय याला मंगळवारी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला शनिवारपर्यंत (७ नोव्हेंबर) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. पायलच्या आत्महत्येनंतर सासू मंगल झांबरे आणि सासरे अरविंद झांबरे हे खासगी रुग्णालयात उपचार घेत होते. बुधवारी सकाळी त्यांना रुग्णालयातून सोडण्यात आल्यानंतर स्वारगेट पोलिसांनी ताब्यात घेतले.

ठळक बातम्या

बंगल्यात मोटार घुसविण्याचा प्रयत्न

पुणे (आरंभ पर्व) : पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या क्वीन्स गार्डन परिसरातील बंगल्यात एका पोलीस कर्मचाऱ्यानेच भरधाव मोटार घेऊन शिरण्याचा प्रयत्न केला. बंगल्यातील सुरक्षा यंत्रणेतील पोलीस कर्मचाऱ्याच्या अंगावर त्याने मोटार घातली. त्याच्या विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याला अटकही करण्यात आली.अमोल वसंतराव भिसे (वय ४२) असे अटक करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. भिसे हा शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात नियुक्तीस आहे. 'भिसे याची मानसिक स्थिती ठीक नाही. भिसेविरुद्ध त्याचा पत्नीने तक्रार दिली होती. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता,' अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली.

प्रमाणपत्राचे नूतनीकरण करा

पुणे (आरंभ पर्व) : शहराचा वाढता विस्तार पाहता महापालिकेच्या अग्निशमन यंत्रणेवरील जबाबदारी अधिक वाढली असून, अग्निशमन सेवा शुल्क आणि वार्षिक शुल्काची आकारणी करण्यास विभागाने प्राधान्य देण्याचे ठरविले आहे. शहरातील ज्या सोसायट्या अग्निशमन विभागाचे 'ना-हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) घेत नाहीत. तसेच, मुदत संपल्यानंतरही अग्निशमन प्रमाणपत्राचे नूतनीकरण करत नाहीत. त्यांचा शोध घेऊन त्यांच्याकडून हे शुल्क वसूल करण्याची तयारी विभागाने सुरू केली आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे मान्यतेसाठी हा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.

शरद पवार यांच्या प्रकृतीत सुधारणा

पुणे (आरंभ पर्व) : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना बुधवारी (४ नोव्हेंबर) पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमधून उपचारांनंतर घरी सोडण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असून, प्रकृतीत सुधारणा झाली आहे. रुग्णालयातून थेट मुंबईतील निवासस्थानी रवाना होणार असल्याची माहिती रुबी हॉल क्लिनिकचे मुख्य हृदयरोगतज्ज्ञ, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. परवेझ के. ग्रँट यांनी अधिकृत निवेदनाद्वारे दिली. खोकला आणि छातीत दुखण्याचा त्रास जाणवू लागल्याने शरद पवार यांना सोमवारी (२ नोव्हेंबर) रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले होते. राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागाचा दौरा सुरू केला होता. या दौऱ्यात दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांशी संवाद साधून पाणीटंचाई, पिकांची स्थिती आणि शेतीसमोरील अडचणी जाणून घेतल्या जात होत्या. मात्र, दौऱ्यादरम्यान त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी दौरा अर्ध्यावरच थांबविला. त्यानंतर वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

गुरुवारची नियोजित पाणीकपात रद्द



पुणे (दै. आरंभ पर्व)

दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेने नागरिकांना दिलासा दिला आहे. गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी करण्यात येणारी नियोजित पाणीकपात रद्द करण्याचा निर्णय महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने घेतला आहे. याबाबत महापौर मंजुषा नागपुरे यांनी प्रशासनाला आदेश दिले होते. त्यामुळे गुरुवारी पुणे शहरातील पाणीपुरवठा नेहमीच्या वेळापत्रकानुसार सुरू राहणार आहे. पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने याबाबत नागरिकांना सूचना जारी केली आहे. दिवाळी निमित्त गुरुवारची नियोजित पाणीकपात रद्द करण्यात आल्याचे या सूचनेत स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित दिवशी शहरातील नागरिकांना नेहमीच्या वेळेनुसार पाणी उपलब्ध होणार आहे. राज्य सरकारने केलेल्या १० टक्के पाणीकपातीच्या सुचने नुसार पुणे महानगरपालिकेकडून दर गुरुवारी शहरातील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येतो. मात्र, दिवाळीच्या सणाच्या काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी गुरुवारची पाणीकपात रद्द करण्यात आली आहे. दरम्यान, गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी नागरिकांनी पाणीकपातीबाबत कोणतीही चिंता करू नये. पाणीपुरवठा नेहमीच्या वेळापत्रकानुसारच केला जाणार असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. महापालिकेच्या या निर्णयामुळे दिवाळीच्या काळात पुणेकरांना दिलासा मिळणार आहे.

'एसीबी' कारवाईनंतर महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे निलंबित

अधिकाऱ्यांच्या विभागांमध्ये बदल



पिंपरी (दै. आरंभ पर्व)

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटकेची कारवाई केल्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्याकडील सर्व विभाग इतर अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले आहेत. सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडे पाणीपुरवठा, संध्या वाघ यांच्याकडे स्थापत्य प्रकल्प आणि विनय ओव्हाळ यांच्याकडे पर्यावरण विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी हे बदल केले आहेत. शहर अभियंता मनोज सेठिया यांच्याकडे उद्यान व क्रीडा स्थापत्यचे अतिरिक्त कामकाज देण्यात आले आहे. सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडे अतिरिक्त विभागांचा कार्यभार सोपविण्यात आला आहे. यामध्ये पाणीपुरवठा विभागासह भामा आसखेड, आंद्रा प्रकल्प, पवना बंदिस्त जलवाहिनी आणि सेक्टर २३ येथील जलशुद्धीकरण केंद्राचा समावेश आहे. सहशहर अभियंता संध्या वाघ यांच्याकडे स्थापत्य प्रकल्प विभागाची, तर सह शहर अभियंता विनय ओव्हाळ यांच्याकडे पर्यावरण विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

लाच प्रकरणात अटक झालेले महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांची विभागीय चौकशी करण्याचे आदेश आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. अटकेच्या दिवसापासून म्हणजेच २९ ऑक्टोबरपासून निलंबन लागू केले आहे. पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून अशोभनीय वर्तन केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. संबंधित विभागाने १५ दिवसांत दोषारोपपत्र ठेवावे. चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी नियुक्तीची कार्यवाही तातडीने करावी, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

ओंभासे मुख्य अभियंता दोन पदावर कार्यरत होते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पडताळणीदरम्यान तक्रारदाराच्या ३८ लाख रुपयांच्या निविदेच्या फाइलवर स्वाक्षरी करण्यासाठी त्यांनी अर्धा टक्का दराने १९ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्याचे आदेशात नमूद आहे. याप्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना १४ नोव्हेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावल्याचेही आदेशात म्हटले आहे.

मुख्यालय सोडण्यास मनाई

निलंबन काळात वरिष्ठांच्या परवानगीशिवाय ओंभासे यांना मुख्यालय सोडता येणार नाही. अन्य नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नसून, त्याबाबतचा मासिक दाखला दिल्यानंतरच निर्वाहभत्ता मिळेल. कार्यालयात अथवा आवारात गैरवर्तन आढळल्यास स्वतंत्र शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे.

शेतकरी, राष्ट्रवादीच्या विरोधानंतर उजनीवरील अणुप्रकल्प अखेर रद्द

एआय डेटा सेंटर, फ्लोटिंग सोलार उभारणार



सोलापूर (दै. आरंभ पर्व)

उजनी धरणावर उभारण्यात येणाऱ्या एआय डेटा सेंटर प्रकल्पावरून निर्माण झालेले गैरसमज आणि अफवांना सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. उजनीवर प्रस्तावित असलेला अणुप्रकल्प आणि ग्रीन हायड्रोजन प्रकल्प हे पूर्वीच्या सामंजस्य करारात होते. तो करार आता बदलण्यात आला असून, नव्या करारातून अणुप्रकल्प आणि ग्रीन हायड्रोजन हे दोन्ही प्रकल्प शंभर टक्के रद्द करण्यात आले आहेत. हा प्रकल्प केवळ डेटा सेंटर आणि फ्लोटिंग सोलार पॉवर प्लँटपुरता मर्यादित राहणार आहे.

या प्रकल्पामुळे शासनाला दरवर्षी सुमारे २०० कोटींचा महसूल मिळणार असून, यासाठी वर्षाला केवळ अर्धा टीएमसी पाण्याचा वापर होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली. या दोन्ही प्रकल्पांना शेतकरी तसेच स्थानिकांनी तीव्र विरोध केला होता. त्याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार गट) याविरुद्ध मोठे आंदोलनही उभे केले होते. आमदार रोहित पवार, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी नुकतेच सोलापूर-पुणे महामार्गावर रास्ता रोको आंदोलनही केले. शेवटी वाढता विरोध लक्षात घेऊन शासनाला अखेर माघार घ्यावी लागली आहे. जिल्हाधिकारी म्हणाले की, 'उजनी धरणात आता केवळ एआय डेटा सेंटर, फ्लोटिंग सोलार पॉवर प्लँट आणि वीज साठवण्यासाठी बॅटरी स्टोअरेज होणार आहे. सोलापूर जिल्ह्यात रोजगाराचे दालन उघडणार आहे. या प्रकल्पामुळे थेट २,८०० नोकऱ्या आणि अप्रत्यक्षरीत्या ४०,००० रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. आयटीआय पास उमेदवारांपासून ते उच्चशिक्षित अभियंत्यांपर्यंत सर्वांना नोकऱ्या मिळतील आणि यात स्थानिक तरुणांना प्राधान्य दिले जाणार आहे. आयटीआय महाविद्यालयासोबत करारही करण्यात येणार आहे. ग्रीन डेटा सेंटर प्रकल्पासाठी ५० टक्क्यांहून अधिक वीज अपारंपरिक ऊर्जा स्रोतातून वापरली जाईल. रात्रीच्या वेळी विजेसाठी महाट्रान्सकोकडून ४०० केव्ही डेडिकेटेड ट्रान्समिशन लाइन टाकली जाईल, जेणेकरून शेती किंवा गावांच्या विजेवर परिणाम होणार नाही.

उजनीतील दोन विनाशकारी प्रकल्प रद्द झाले ही अत्यंत चांगली बाब आहे. मात्र, आता जे दोन नवीन प्रकल्प उभे राहणार आहेत, त्यांचे सर्वात आधी पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन होणे अत्यंत गरजेचे आहे. आम्ही आंदोलन केले तेव्हा पाटबंधारे विभागाचे उपअभियंता हे प्रकल्प रद्द झाल्याचे सांगत होते. आता खुद्द जिल्हाधिकाऱ्यांनीच प्रकल्प रद्द झाल्याचे सांगितल्याने, ही माहिती अधिकृत आहे, असे समजायला काहीच हरकत नाही. -धैर्यशील मोहिते-पाटील, खासदार डेटा सेंटरमधील सर्व्हर थंड करण्यासाठी क्लोज्ड लूप ड्राय कुलिंग सिस्टिमचे तंत्रज्ञान वापरले जाईल. त्यामुळे बाष्पीभवन न होता पाणी पुन्हा वापरता येते. प्रकल्पासाठी वर्षाला जास्तीत जास्त केवळ ०.५ टीएमसी पाणी लागेल. याउलट, उजनीच्या पाण्यावर फ्लोटिंग सोलार पॅनल्स बसवल्याने उष्णतेने होणारे पाण्याचे बाष्पीभवन थांबेल. वर्षाला सुमारे १.५ ते १.७ टीएमसी पाणी वाचेल. याचाच अर्थ, हा प्रकल्प जेवढे पाणी वापरेल त्यापेक्षा तिप्पट पाणी वाचवणार आहे.

शेतकऱ्यांची १ गुंठाही जमीन नाही

शेतकऱ्यांची एक गुंठाही जमीन सक्तीने (भूसंपादन) घेणार नाही. } पाण्याचा वापर करताना पहिला हक्क पिण्याच्या पाण्याचा, दुसरा हक्क शेतीचा आणि त्यानंतरच उरलेले पाणी उद्योगाला दिले जाईल. }याशिवाय, धरणात मासेमारी करणाऱ्या स्थानिक मासेमार बांधवांच्या हक्कावरही कोणतीही गदा येणार नाही, त्यांच्या व्यवसायाचे पूर्ण रक्षण केले जाईल. भारतात इंटरनेट आणि एआय वापरणाऱ्यांची संख्या जगात सर्वाधिक वेगाने वाढत असून, देशाची आणि डेटाची सुरक्षितता राखण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. हा प्रकल्प एकूण सहा टप्प्यांत उभारला जाणार असून, २०३१ पर्यंत १४०० मेगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर, २००० मेगावॅट क्षमतेचा फ्लोटिंग सोलर प्लांट आणि १८०० मेगावॅट अवर क्षमतेची बॅटरी येथे उभारली जाईल. पहिल्या टप्प्यात ५०० मेगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर भीमानगर येथे सुरू होईल.

वसुबारस : गोमातेच्या पूजनातून निसर्ग, संस्कृती आणि कृतज्ञतेचा संदेश!

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...



भारतीय संस्कृतीत गायीला केवळ पशू नव्हे, तर समृद्धी, संवेदना आणि मातृत्वाचे प्रतीक मानले जाते. मात्र, सण साजरा करताना गोसंवर्धन, पशुकल्याण आणि शेतकऱ्यांच्या जगण्याचे भान ठेवणे हीच काळाची खरी गरज आहे.

भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणामागे एक विशिष्ट विचार, परंपरा आणि जीवनमूल्य दडलेले आहे. दिवाळीच्या मंगलमय पर्वाची सुरुवात वसुबारस या सणाने होते. आश्विन महिन्यातील वद्य द्वादशीला साजरा होणारा हा सण म्हणजे गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. भारतीय संस्कृतीत गायीला मातेचे स्थान देण्यात आले असून, तिच्या माध्यमातून माणसाला निसर्गाशी असलेले नाते आणि सहजीवनाचे महत्त्व पटवून दिले जाते.

पूर्वीच्या काळात शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार होता. शेतीच्या कामात बैलांचे योगदान, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमुळे कुटुंबाला मिळणारे पोषण, तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेतील पशुधनाचे महत्त्व अनन्यसाधारण होते. त्यामुळे गायीचे स्थान केवळ धार्मिक नव्हे, तर आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातही महत्त्वाचे राहिले आहे. वसुबारस हा याच योगदानाची जाणीव करून देणारा सण आहे.

आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जीवनात अनेक परंपरा केवळ औपचारिकतेपुरत्या मर्यादित होताना दिसतात. वसुबारसच्या दिवशी गायीची पूजा केली जाते, औक्षण केले जाते, तिला नैवेद्य अर्पण केला जातो. मात्र, खरा प्रश्न असा आहे की, एका दिवसाच्या पूजनाने आपली गोमातेप्रती असलेली जबाबदारी पूर्ण होते का? वर्षभर गायींची योग्य काळजी घेणे, त्यांना चारा-पाणी उपलब्ध करून देणे, आजारी आणि निराधार जनावरांचे संगोपन करणे हीदेखील तितकीच महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे.

दुसरीकडे, आज ग्रामीण भागातील शेतकरी आर्थिक संकटांचा सामना करत आहे. पशुपालनाचा वाढता खर्च, चाऱ्याची टंचाई, पशुवैद्यकीय सुविधांचा अभाव आणि दुधाला मिळणारा अपुरा दर यामुळे पशुपालन व्यवसाय अनेकांसाठी आव्हानात्मक बनला आहे. गोमातेचे महत्त्व सांगताना तिचे संगोपन करणाऱ्या शेतकरी आणि पशुपालकांच्या समस्यांकडेही समाजाने आणि शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे.

वसुबारस हा केवळ धार्मिक विधीचा दिवस नसून, माणूस आणि निसर्ग यांच्यातील परस्परावलंबित्व अधोरेखित करणारा सण आहे. मुक्या प्राण्यांप्रती दया, संवेदना आणि जबाबदारीची भावना समाजात रुजविण्याची ही संधी आहे. सणाच्या नावाखाली प्राण्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घेणेही आवश्यक आहे. आज पर्यावरणाचा समतोल बिघडत असताना, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि पशुधनाचे संरक्षण ही काळाची गरज बनली आहे. भारतीय सण-उत्सवांमधील पर्यावरणपूरक विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविणे आवश्यक आहे.

वसुबारसच्या निमित्ताने प्रत्येकाने एक संकल्प करायला हवा गोमातेचे पूजन केवळ एका दिवसापुरते न ठेवता वर्षभर पशुप्रेम, गोसंवर्धन आणि पशुकल्याणाची भावना जपायची. निराधार जनावरांना मदत करायची, पशुपालकांच्या कष्टांची जाणीव ठेवायची आणि निसर्गाशी असलेले नाते अधिक दृढ करायचे.

कारण, खरी संस्कृती ही केवळ परंपरा पाळण्यात नसते, तर त्या परंपरेमागील मूल्ये जगण्यात असते. वसुबारसचा खरा संदेशही हाच आहे पूजेसोबत संवेदना, श्रद्धेसोबत कर्तव्य आणि परंपरेसोबत सामाजिक बांधिलकी!

हीच वसुबारसची खरी शिकवण आणि दिवाळीच्या प्रकाशपर्वाची मंगल सुरुवात ठरावी!

विकासाला मिळणार नवी गती!

प्रभाग क्रमांक ४ मध्ये २ कोटी ६० लाखांची विकासकामे मंजूर

- रस्ते, ड्रेनेज, क्रीडा सुविधा आणि नाना-नानी पार्कसह विविध कामांचा समावेश



जुन्नर शहर (दै. आरंभ पर्व)

जुन्नर नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ४ मधील सर्वांगीण विकासाला नवी गती मिळणार असून, विविध विकासकामांसाठी तब्बल २ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. आमदार शरददादा सोनवणे यांच्या माध्यमातून, नगरसेवक पै. मयूर शिवाजी महाबरे यांच्या प्रयत्नातून आणि नगरसेविका सौ. सुवर्णाताई राज जाधव यांच्या सहकार्यातून ही विकासकामे मार्गी लागणार आहेत.

प्रभाग क्रमांक ४ मध्ये मंजूर झालेल्या विकासकामांमध्ये दिल्ली पेठ चौक ते मुक्ताई मंदिर, दिल्ली पेठ या रस्त्याची सुधारणा व ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ४० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच अहिल्याबाई होळकर शाळा क्रमांक ४ येथील इनडोअर स्टेडियमसाठी वेटलिफ्टिंग मॅट, रेसलिंग मॅट, व्यायाम साहित्य, कबड्डी मॅट व इतर क्रीडा साहित्य खरेदीसाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. शुक्रवार पेठेतील कालिकामाता मंदिर ते अशोक क्षीरसागर यांच्या घरापासून दिनेश साळवे यांच्या घरापर्यंत रस्ता सुधारणा व ड्रेनेज लाईनसाठी ५० लाख रुपये, जुना स्टॅन्ड ते नवरंग मेडिकल, नेहरू बाजार परिसरातील रस्ता सुधारणा व ड्रेनेज लाईनसाठी ७० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

याशिवाय एम.एस.सी.बी. गेट ते तलाठी ऑफिस गेट परिसरातील मोकळ्या जागेत नागरिकांसाठी नाना-नानी पार्क, ओपन जिम तसेच लहान मुलांसाठी खेळण्यांची सुविधा निर्माण करण्यासाठी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या विकासकामांमुळे प्रभागातील रस्ते, पायाभूत सुविधा, क्रीडा सुविधा आणि सार्वजनिक मनोरंजनाच्या साधनांमध्ये सुधारणा होणार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक आणि लहान मुलांसाठी या सुविधा उपयुक्त ठरणार आहेत.

शब्दांपेक्षा विकासकामांतून विश्वास निर्माण करण्याचा निर्धार करत प्रभाग क्रमांक ४ च्या सर्वांगीण विकासासाठी आमदार शरददादा सोनवणे यांचे विशेष आभार मानण्यात आले. या विकासकामांसाठी नगरसेवक पै. मयूर शिवाजी महाबरे यांनी विशेष प्रयत्न केले असून, नगरसेविका सौ. सुवर्णाताई राज जाधव यांचे सहकार्य लाभले आहे. प्रभाग क्रमांक ४ मधील या विकासकामांमुळे परिसराच्या विकासाला चालना मिळणार असून, नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

थोडक्यात पण महत्वाचे

फटाक्यांच्या ठिणग्यांमुळे अंधत्वाचा धोका; नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. अनिल दूधभाते



पुणे (आरंभ पर्व) : दिवाळीचा आनंद साजरा करताना फटाक्यांमुळे डोळ्यांना होणाऱ्या संभाव्य दुखापतींकडे दुर्लक्ष करू नका. फटाक्यांच्या ठिणग्या, उष्णता आणि उडणाऱ्या तुकड्यांमुळे डोळ्यांना गंभीर इजा होऊन काही वेळा कायमस्वरूपी दृष्टी गमावण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे फटाके फोडताना योग्य खबरदारी घ्यावी आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन डॉ. दूधभाते नेत्रालय आणि रेटिना सेंटरचे वरिष्ठ नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. अनिल दूधभाते यांनी केले आहे. फटाके पेटवणाऱ्या व्यक्तींसोबतच जवळ उभ्या असलेल्या नागरिकांनाही त्याचा धोका असतो. विशेषतः लहान मुलांना फटाक्यांपासून दूर ठेवणे आवश्यक आहे. फुलबाज्यांसारखे फटाकेही पूर्णपणे सुरक्षित नसून त्यातून उडणाऱ्या ठिणग्या आणि निर्माण होणाऱ्या उष्णतेमुळे डोळ्यांना इजा होऊ शकते. फटाके फोडताना सुरक्षित अंतर राखावे, शक्यतो संरक्षणात्मक चष्मा वापरावा. लहान मुलांना फटाके हाताळू देऊ नयेत. न पेटलेले किंवा अर्धवट जळालेले फटाके पुन्हा पेटवण्याचा प्रयत्न करू नये. फटाक्यांवर वाकून पाहणे किंवा हातात धरून ते पेटवणे टाळावे. तसेच गर्दीच्या ठिकाणी अथवा इतर व्यक्तींच्या दिशेने फटाके उडवू नयेत, अशी सूचनाही डॉ. दूधभाते यांनी केली. फटाक्याची ठिणगी किंवा तुकडा डोळ्यात गेल्यास डोळा चोळू नये किंवा त्यावर दाब देऊ नये. डोळ्यात रुतलेला तुकडा स्वतः काढण्याचा प्रयत्न करू नये. भेदक जखमेची शक्यता असल्यास डोळा पाण्याने धुणे टाळून तातडीने नेत्ररोगतज्ज्ञांकडे जावे. डोळ्यात रसायन पडल्यास मात्र त्वरित भरपूर स्वच्छ पाण्याने धुऊन वैद्यकीय मदत घ्यावी. डोळा दुखणे, लाल होणे, सतत पाणी येणे किंवा दृष्टी धूसर होणे ही लक्षणे दिसल्यास वेळ न घालवता तपासणी करून घ्यावी. "दिवाळी हा प्रकाशाचा सण आहे. क्षणिक आनंदासाठी आयुष्यभराची दृष्टी धोक्यात घालू नका. स्वतःच्या आणि इतरांच्या डोळ्यांची काळजी घेऊन सुरक्षित दिवाळी साजरी करा," असे आवाहन डॉ. अनिल दूधभाते यांनी केले.

वडगाव शेरीतील मजूर अड्ड्याचा प्रश्न १५ वर्षांपासून प्रलंबित

तत्कालीन पालिका उपायुक्तांच्या आश्वासनाची पूर्तता होणार तरी कधी?

- मजुरांच्या मूलभूत सुविधांकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष
- शाळा, नागरिक आणि वाहनचालकांनाही वाहतूक कोंडीचा फटका
- निवारा, स्वच्छतागृह आणि स्वच्छतेअभावी मजुरांचे हाल



पुणे : निरंजन (सोमनाथ) साळुंके (दै. आरंभ पर्व)

महापालिकेला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळवून देणाऱ्या वडगाव शेरी परिसरातील गणेशनगर येथील मजूर अड्ड्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी तत्कालीन महापालिका उपायुक्तांनी या मजुरांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आजही त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नसल्याने तत्कालीन उपायुक्तांच्या आश्वासनाचे पुढे काय झाले, असा सवाल मजुरांकडून उपस्थित केला जात आहे. सुमारे ४० ते ४५ वर्षांपूर्वी महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या वडगाव शेरी परिसरात राज्यातील विविध भागांतून बेरोजगार तरुण रोजगाराच्या आशेने येत असतात. खासगी कंपन्यांची दारे ठोठावूनही अनेकांना रोजगार मिळत नसल्याने त्यांच्यासमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत टाटा गार्डन-साईनाथनगर मार्गावरील गणेशनगर परिसरात दररोज शेकडो मजूर कामाच्या शोधात एकत्र येतात. सध्या या ठिकाणी पाचशेहून अधिक मजूर थांबत असल्याचे चित्र आहे.

आश्वासनाला १५ वर्षे; आंदोलनकर्तेही गायब!

सुमारे पंधरा वर्षांपूर्वी मजुरांची बिकट अवस्था लक्षात घेऊन एका राजकीय पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी येथे स्वतंत्र मजूर अड्डा उभारण्याच्या मागणीसाठी आवाज उठविला होता. यासाठी आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता. त्यावेळी या प्रश्नाची दखल घेत तत्कालीन महापालिका उपायुक्त भानुदास माने यांनी प्रत्यक्ष मजूर अड्ड्याला भेट देऊन मजुरांच्या प्रलंबित समस्या सोडविण्याचा दावा केला होता.

येरवडा, लोहगाव, वाघोलीतील मजुरांचाही प्रश्न ऐरणीवर!

वडगाव शेरीपुरताच हा प्रश्न मर्यादित नसून येरवडा, लोहगाव आणि वाघोली यांसारख्या उपनगरांमध्येही कामाच्या शोधात येणाऱ्या मजुरांना अशाच समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ एका परिसराची समस्या म्हणून न पाहता संपूर्ण शहरातील असंघटित कामगारांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज आहे. महापालिका प्रशासनाने मजुरांसाठी स्वतंत्र जागा, निवारा, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि नियमित स्वच्छतेची व्यवस्था करणे अपेक्षित आहे. मात्र, या मूलभूत सुविधांसाठीही मजुरांना वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी दररोज कामाच्या शोधात घराबाहेर पडणाऱ्या या मजुरांना न्याय कोण देणार? तत्कालीन उपायुक्तांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होणार तरी कधी? महापालिका प्रशासनातील विद्यमान अधिकारी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन ठोस कार्यवाही करणार का? की मजुरांच्या समस्यांचा हा प्रश्न असाच वर्षानुवर्षे प्रलंबित राहणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मात्र, हा मजूर अड्डा भरचौकात आणि रस्त्यालगत असल्याने परिसरातील नागरिकांसह वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. याच परिसरात खासगी शाळा असल्याने शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांनाही या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे मजुरांसाठी स्वतंत्र आणि नियोजनबद्ध जागा उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने होत आहे. मजूर अड्ड्यावर येणाऱ्या कामगारांसाठी महापालिका प्रशासनाकडून साधे पत्र्याचे शेडदेखील उभारण्यात आलेले नाही. त्यामुळे पावसाळ्यात मुसळधार पावसात भिजत, तर उन्हाळ्यात कडक उन्हात उभे राहून मजुरांना कामाची प्रतीक्षा करावी लागते. यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून आजारांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

त्यातच परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आणि कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. परिणामी, हा मार्ग कचऱ्याचे आगार बनत चालला आहे. स्वच्छतेच्या अभावामुळे मजुरांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

विशेष म्हणजे, या ठिकाणी येणाऱ्या पुरुष आणि महिला मजुरांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था नसल्याने त्यांना उघड्यावर शौचास जाण्याची वेळ येत आहे. रोजगारासाठी दररोज संघर्ष करणाऱ्या या मजुरांना मूलभूत सुविधाही मिळत नसतील, तर महापालिका प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

मात्र, पंधरा वर्षांचा कालावधी उलटूनही परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला नाही. तत्कालीन उपायुक्तांनी दिलेले आश्वासन प्रत्यक्षात उतरले नाही. दुसरीकडे, या प्रश्नासाठी आंदोलनाचा इशारा देणारे राजकीय पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्तेही आता या प्रश्नावर सक्रिय दिसत नसल्याने मजुरांच्या समस्येकडे पाठ फिरविण्यात आल्याची भावना व्यक्त होत आहे.

चार राज्यांत पुणे पोलिसांचा थरारक तपास!

'रजिया सुलतान गँग'चे दोन सदस्य उत्तर प्रदेशातून जेरबंद

- दिल्लीपासून मध्य प्रदेशपर्यंत पोलिसांची शोधमोहीम
- गाझियाबादमध्ये आरोपींच्या मुसक्या आवळल्या
- घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणत तब्बल १० लाखांचा मुद्देमाल जप्त!



चार राज्यांत तपासाचे जाळे विणत गाझियाबादपर्यंत पोहोचलेल्या विश्रामबाग पोलिसांच्या या कामगिरीमुळे घरफोडी करणाऱ्या टोळ्यांना पुणे पोलिसांचा कडक इशारा मिळाला आहे. गुन्हेगार कितीही दूर पळाले, तरी कायद्याच्या कचाट्यातून त्यांची सुटका नाही, हेच या कारवाईतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

पुणे (दै. आरंभ पर्व)

घरफोडी करून दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या टोळीचा पुणे पोलिसांनी चार राज्यांत धडक तपास करून पर्दाफाश केला आहे. दिल्ली, हरियाणा, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश अशा चार राज्यांत तब्बल सात दिवस शोधमोहीम राबवत विश्रामबाग पोलिसांच्या तपास पथकाने 'रजिया सुलतान गँग'मधील दोन सराईत आरोपींना उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथून बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईत घरफोडीच्या गुन्ह्याची उकल करण्यात यश आले असून, आरोपींकडून जवळपास १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुरनं. ३२७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ), ३३१(३), ३(५) अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी घरात नसल्याची संधी साधून अज्ञात आरोपींनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला आणि दागिने चोरून नेले होते. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप यांनी तपास पथकाला तातडीने गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले. सहायक पोलीस निरीक्षक उमेश कारके यांनी पथकातील कर्मचाऱ्यांना योग्य सूचना देत तपासाची दिशा निश्चित केली. तपास पथकातील पोलीस अंमलदार अर्जुन थोरात यांनी घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयित आरोपींची छायाचित्रे मिळवली. त्यानंतर तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास सुरू असताना पोलीस हवालदार नितीन मुंढे आणि पोलीस अंमलदार अनिस शेख यांना गोपनीय बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली.

या गुन्ह्यातील संशयित आरोपी उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथील असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

दि. २३ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सहायक पोलीस निरीक्षक उमेश कारके यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक दिल्ली, हरियाणा, मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश या चार राज्यांत रवाना झाले. विविध ठिकाणी स्थानिक पोलिसांची मदत घेत तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. अखेर उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे पोलिसांनी सापळा रचून आरोपी हबीब हफीज सैफी आणि अकबर ऊर्फ फिरोज सुलतान सैफी या दोघांना जेरबंद केले. त्यांना पोलीस कोठडीत घेऊन अधिक तपास केला असता, ते 'रजिया सुलतान गँग'मधील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींकडून संबंधित गुन्ह्यातील जवळपास १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहआयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले, सहायक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप, पोलीस निरीक्षक विकास भिंगारदिवे आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) रमेश लाहिगुडे यांच्या सूचना व मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या तपास पथकात सहायक पोलीस निरीक्षक उमेश कारके, सत्यवान गेंड, पोलीस उपनिरीक्षक मेहबुब मोकाशी तसेच पोलीस अंमलदार सचिन कदम, नितीन मुंढे, महेश कदम, शैलेश सुर्वे, सचिन अहिवळे, शशिकांत दरेकर, कैलास डुकरे, जाकीर मणियार, फिरोज इनामदार, अनिस शेख, शिवदत्त गायकवाड, अर्जुन थोरात आणि नितीन बाबर यांनी सहभाग घेतला.

जलतारा प्रबोधन कार्यशाळा व प्रात्यक्षिकाचे आयोजन

- शेतकऱ्यांना मिळणार जलसंधारणाचे शास्त्रीय मार्गदर्शन

राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

खेड तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पाणीटंचाईच्या समस्येतून कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी तसेच शेतीमध्ये वर्षभर पाण्याची उपलब्धता निर्माण व्हावी, या उद्देशाने आमदार बाबाजी काळे यांच्या संकल्पनेतून 'जलतारा प्रबोधन कार्यशाळा व प्रात्यक्षिक' शिबीर आयोजित करण्यात आले आहे. पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि उपलब्ध पाण्याचा प्रभावी वापर याबाबत शेतकऱ्यांना शास्त्रीय व तांत्रिक मार्गदर्शन मिळावे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी केवळ पावसावर अवलंबून न राहता गावपातळीवर जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणे, शेतातील पाणी जमिनीत जिरविणे आणि भूजलपातळी वाढविणे यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर यावेळी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेस प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ उपस्थित राहणार असून ते जलतारा प्रकल्पाचे संशोधक, राज्यस्तरीय आदर्श गाव समितीचे सदस्य तसेच जलतारा प्रकल्प, मनरेगा व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, महाराष्ट्र शासन यांच्याशी संबंधित प्रशिक्षक व समन्वयक आहेत. ते शेतकऱ्यांना जलतारा संकल्पनेची माहिती देऊन प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे पाणी संवर्धनाचे तंत्र समजावून सांगणार आहेत. गुरुवारी (दि. ५) दुपारी १२ वाजता शिरोली टोलनाक्याजवळील शालीमार बँक्वेट हॉल येथे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन सभापती गौरी मुऱ्हे, उपसभापती दिलीप डुबे यांच्या पुढाकाराने पंचायत समिती खेड, जिल्हा परिषद विभाग, कृषी उत्पन्न बाजार समिती खेड, खरेदी-विक्री संघ तसेच तालुक्यातील विविध शेतकरी संघटनांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. ०५ नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



देशातील दोन कर्तृत्ववान महिलांचा जागतिक सन्मान!

जुन्नर (आरंभ पर्व) : संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (FAO – Food and Agriculture Organization of the United Nations) यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या '100 Women Heroes in Agrifood System and Rural Development' या जागतिक उपक्रमांतर्गत भारतातील दोन कर्तृत्ववान महिलांना सन्मानित करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना युनायटेड नेशन्स विशेषी कृत संस्था आहे. जगभरातील भूक कुपोषण अन्नसुरक्षा शेतीचा विकास आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ही संस्था कार्य करते या संस्थेचे युरोपियन युनियन सह १९४ देश सदस्य आहेत. १६ ऑक्टोबर हा दिवस जागतिक अन्न म्हणून साजरा करतात. ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांना जागतिक स्तरावरून ओळख मिळवून देणे, शेतीमध्ये महिलांचा सहभाग वाढवणे, महिला बचत गट व उद्योजकांना प्रोत्साहन देणे, शेतमाला योग्य बाजारभाव मिळून देण्यासाठी प्रयत्न करणे आदींसाठी संस्था प्रयत्नशील असते. भारतात एफएओ चे काम १९४८ पासून सुरू झाले आहे. भारतामध्ये या कार्यालयाची स्थापना १९७७ मध्ये झाली जागतिक अन्न व्यवस्था व कृषी क्षेत्रातील परिवर्तनासाठी युवा महिला संशोधक आणि विविध भागधारक यांना एकत्र आणणारे व्यासपीठ यामधून शंभर वुमन हिरोज यासाठी भारतातून दोन महिलाची निवड केली गेली होती. या जागतिक उपक्रमासाठी १३१ देशांनी सहभाग नोंदविला.एकूण ६०९ महिलांची नामांकने संस्थेला प्राप्त झाली.भारताच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने या उपक्रमासाठी देशभरातील २० महिलांची नामांकने पाठविली होती.जागतिक स्तरावर पारदर्शक आणि बहुस्तरीय निवड प्रक्रियेनंतर अंतिम महिलांची निवड करण्यात आली.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

- कर्वे समाजसेवा संस्थेच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरावर यश!

पुणे (आरंभ पर्व) : कर्वे समाजसेवा संस्था, पुणे आणि दि पूना स्कूल अँड होम फॉर द ब्लाइंड यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी नाट्यचळवळ राबविण्यात आली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय दिव्यांग बालनाट्य स्पर्धेत सहभाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले. या नाट्यप्रयोगाचे दिग्दर्शन कर्वे समाजसेवा संस्थेचे विद्यार्थी ओमप्रकाश गवई यांनी केले, तर नाटकाचे व्यवस्थापन तन्मय गायकवाड यांनी सांभाळले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांना अभिनयासाठी रौप्य पुरस्कार, तर प्रकाशयोजनेसाठी तृतीय क्रमांक प्राप्त झाला. संस्थेचे संचालक प्रा. (डॉ.) महेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेला हा उपक्रम केवळ नाट्यप्रयोग नसून दिव्यांग विद्यार्थ्यांना समान संधी, अभिव्यक्तीचे व्यासपीठ आणि आत्मविश्वास मिळवून देणारी एक महत्त्वपूर्ण सामाजिक चळवळ ठरली. कला, समावेशकता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला.

पालिका आयुक्तांचे वेतन रोखण्याचे आदेश, सुप्रीम कोर्टाचा झटका



मुंबई (आरंभ पर्व) : शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याच्या आदेशाचे पालन न केल्यावरून सर्वोच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांना झटका दिला आहे. न्यायालयाने त्यांना पाच लाख रुपयांचा दंड ठोठावला असून आयुक्तांसह त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे नोव्हेंबर महिन्याचे वेतन थांबवण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने याप्रकरणी आयुक्तांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. बेस्ट बस स्थानकासाठी निश्चित केलेल्या 3,400 चौरस मीटर जमिनीचा ताबा महापालिकेला द्यावा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने 13 ऑगस्ट 2025 रोजी अतिक्रमण करणाऱ्या विकासकाला दिले होते. त्यानंतर 28 जुलै 2026 रोजीदेखील न्यायालयाने आदेश दिले होते. त्यावर महापालिकेने कोणतीही कारवाई केली नाही. या कारवाईसाठी मुदतवाढीची मागणी महापालिका आयुक्तांनी केली होती. मात्र, न्यायालयाने ती फेटाळली. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने आयुक्तांना चांगलेच फटकारले. महापालिकेने मुदतवाढीसाठी मराठीमधील कागदपत्रांचे इंग्रजीमध्ये भाषांतर करण्यासाठी वेळ लागत असल्याचे कारण दिले. मात्र, न्यायालयाने त्यावरूनही पालिकेला चांगलेच झापले. न्या. बागची यांनी डॉ. तांबे या अधिकाऱ्याने दाखल केलेल्या शपथपत्राचा हवाला दिला. अधिकाऱ्यांना मराठी येत नाही, यावर आम्ही विश्वास ठेवावा असे तुम्हाला वाटते का, असा सवाल न्या. बागची यांनी केला.

ऑरेंज हेल्थ लॅब्सचा पुण्यात प्रवेश



पुणे (आरंभ पर्व) : ऑरेंज हेल्थ लॅब्स या भारतातील आघाडीच्या ऑन-डिमांड डायग्नोस्टिक्स लॅबने पुण्यात प्रवेश केल्याची घोषणा केली आहे. स्वतःची प्रयोगशाळा (लॅबोरेटरी), प्रसिद्ध जलद होम सॅम्पल कलेक्शन सेवा आणि ६ तासांत रिपोर्ट देण्याची सुविधा सुरू करून कंपनीने पुणे शहरात आपली उपस्थिती विस्तारली आहे. कंपनी सुरुवातीच्या टप्प्यात पुण्यातील प्रमुख भागांमध्ये सेवा देणार आहे, ज्यामध्ये हिंजवडी, वाकड, बाणेर, औंध, पाषाण, बावधन, ताथवडे, बालेवाडी, पुनावळे, रहाटणी, पिंपरीचे काही भाग, हडपसर, कोरेगाव पार्क, दिघी, मुंढवा, कल्याणी नगर आणि खराडी यांचा समावेश आहे. जुलै २०२६ पर्यंत २०० कोटी रुपयांच्या वार्षिक महसूल वाढ दरावर आधारित हा पुणे विस्तार ऑरेंज हेल्थ लॅब्सच्या वाढीच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ग्राहक वाढत्या प्रमाणात सोयीस्कर, जलद आणि विश्वासार्ह तपासणी सेवांना पसंती देत असल्याने कंपनी पुण्यात पोहोच वाढवण्याची आणि स्वतःचा रेव्हेन्यू आधार अधिक दृढ करण्याची मोठी संधी पाहत आहे. तंत्रज्ञान, लॅबोरेटरी पायाभूत सुविधा, कलेक्शन सेंटर्स आणि नवीन निदान क्षमतांमध्ये गुंतवणूक करून ऑरेंज हेल्थ लॅब्सचा उद्देश मोठ्या ग्राहकवर्गाला सेवा देणे आणि नव्या बाजारपेठांमध्ये विस्तार करताना शाश्वत वाढ साध्य करणे हा आहे.

शासनाच्या विकासकामांची माहिती घराघरांत पोहोचविण्यासाठी 'व्हिजन फाउंडेशन पुरंदर'चा पुढाकार

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते मंत्रालयात विशेष दिवाळी शुभेच्छापत्राचे अनावरण; महायुती सरकारच्या लोकहिताच्या निर्णयांची पुरंदरकरांना मिळणार माहिती

सासवड (स्वप्निल गायकवाड) (दै. आरंभ पर्व)

शेतकरी सुखी तर महाराष्ट्र समृद्ध, हा विचार केंद्रस्थानी ठेवून पुरंदर तालुक्यातील नागरिकांपर्यंत शासनाच्या विकास योजना, लोककल्याणकारी निर्णय आणि सकारात्मक विचार पोहोचविण्यासाठी व्हिजन फाउंडेशन पुरंदरच्या वतीने यंदाच्या दिवाळीनिमित्त विशेष शुभेच्छापत्र प्रकाशित करण्यात आले आहे. या शुभेच्छापत्राचे अनावरण ३ नोव्हेंबर रोजी मंत्रालयात महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. दिवाळीच्या शुभेच्छांबरोबरच शासनाच्या निर्णयांची माहिती सर्वसामान्य



नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा अभिनव प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने घेतलेले विविध लोकहिताचे निर्णय तसेच महसूल विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या महत्त्वपूर्ण योजना व उपक्रमांची माहिती या शुभेच्छापत्राद्वारे पुरंदर तालुक्यातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. विशेषतः शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि ग्रामीण भागातील जनतेला शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळावी, त्यांना शासकीय निर्णयांचा लाभ घेता यावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. शासनाचे निर्णय केवळ कागदावर न राहता त्यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचणे आणि विकासाच्या प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढणे आवश्यक असल्याची भूमिका या उपक्रमातून मांडण्यात आली आहे. केवळ दिवाळीच्या शुभेच्छा देण्यापुरता मर्यादित न राहता जनजागृती, विकासाभिमुख विचार आणि लोककल्याणकारी योजनांचा प्रसार करण्याचा प्रयत्न व्हिजन फाउंडेशनने केला आहे. पुरंदर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी, सक्षम समाजनिर्मितीसाठी आणि शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी फाउंडेशन यापुढेही विविध उपक्रम राबविणार असल्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. या उपक्रमासाठी श्री. मयूर राजेंद्र जगताप, ॲड. गणेश मेमाणे, श्री. श्रीकांत थिटे आणि व्हिजन फाउंडेशन पुरंदर यांनी पुढाकार घेतला आहे. 'सर्वांगीण विकास, सक्षम समाज आणि समृद्ध पुरंदर' या ध्येयवाक्याने व्हिजन फाउंडेशनने दिवाळीच्या शुभेच्छांसोबत विकासाचा संदेश घराघरांत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.

पुण्यात प्रेस्टोचे आगमन; कल्याणी नगर मध्ये भव्य फ्लॅगशिप स्टोअर सुरू

पुणे (दै. आरंभ पर्व)

कपडे, शूज आणि बॅगची जागतिक दर्जाची स्वच्छता, देखभाल व दुरुस्ती सेवा देणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रीमियम ब्रँड 'प्रेस्टो'ने पुण्यात पदार्पण केले आहे. कल्याणीनगर येथे कंपनीच्या भव्य फ्लॅगशिप स्टोअरचे उद्घाटन करण्यात आले. यासह प्रेस्टोने पुण्यात दोन स्टोअर्स सुरू केली असून, दुसरे सेवा केंद्र कोरेगाव पार्क येथे कार्यरत आहे. या उद्घाटनप्रसंगी प्रेस्टो इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत कासलीवाल यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधी आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सशी संवाद साधला. युरोपमधील कपड्यांची देखभाल आणि स्वच्छता सेवा क्षेत्रातील मोठ्या ब्रँड्सपैकी एक असलेल्या



प्रेस्टोला जागतिक स्तरावर ओळख आहे. भारतात गेल्या १८ वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या या ब्रँडने मुंबई, दिल्ली, बंगळुरू आणि हैदराबादमध्ये प्रीमियम ड्रायक्लीनिंग व लॉन्ड्री सेवांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. कंपनीकडून ड्रायक्लीनिंग, कपडे धुणे, इस्त्री, कपड्यांची दुरुस्ती, शिवणकाम तसेच साड्या, सूट, दैनंदिन वापरातील कपडे आणि लग्नसमारंभातील विशेष पोशाखांची स्वच्छता व देखभाल केली जाते.

कलाकारांच्या दिवाळी स्नेहमेळाव्यात तृप्ती देसाई यांची विशेष उपस्थिती!

बालगंधर्व परिवार ट्रस्टच्या दिवाळी कलाकार स्नेहमेळाव्यात मान्यवरांची मांदियाळी; कलाकारांना दिवाळी फराळ किटचे वाटप

पुणे (दै. आरंभ पर्व)

कलाकारांच्या कलागुणांचा सन्मान, आपुलकीच्या नात्यांची जपणूक आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम बालगंधर्व परिवार ट्रस्ट आयोजित दिवाळी कलाकार स्नेहमेळाव्यात पाहायला मिळाला. या कार्यक्रमाला भूमाता ब्रिगेडच्या संस्थापिका आणि सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. दिवाळीच्या मंगलमय वातावरणात आयोजित या स्नेहमेळाव्यात कलाकार, रसिक, चित्रपट क्षेत्रातील सहकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी एकत्र येत दीपावलीचा आनंद साजरा केला. कलाकारांच्या कलेला प्रोत्साहन देण्यासोबतच त्यांच्याशी स्नेहाचे नाते अधिक



दृढ करण्याचा या उपक्रमाचा उद्देश दिसून आला. याप्रसंगी जगद्गुरुकृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर, डॉ. संजयजी चोरडिया, दीपालीताई कांबळे, भूमाता ब्रिगेडच्या तृप्तीताई देसाई, दत्तात्रय पी. येमूल, राजेशजी कामठे साहेब आणि रोहन कुंभार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे उपस्थित सभासदांना दिवाळी फराळ किटचे करण्यात आलेले वाटप. सणासुदीच्या काळात कलाकारांच्या आनंदात सहभागी होत त्यांच्याप्रती आपुलकी आणि सामाजिक जिव्हाळा व्यक्त करण्याचा हा उपक्रम ठरला.

भूमाता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई यांच्या उपस्थितीने या स्नेहमेळाव्याला सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचीही जोड मिळाली. कलाकार आणि समाज यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ करणाऱ्या अशा उपक्रमांची आजच्या काळात विशेष गरज असल्याचे या आयोजनातून अधोरेखित झाले.

कलेचा सन्मान, माणुसकीचा जिव्हाळा आणि दिवाळीच्या आनंदाची देवाणघेवाण अशा वातावरणात हा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. कलाकार, सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी हा सोहळा आनंददायी आठवण ठरला. कलाकारांचा सन्मान आणि त्यांच्या आनंदात सहभागी होण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला.

अवकाळी पावसाचा भातशेतीला फटका

अवकाळी पावसाने मावळातील भातशेतीचे नुकसान

तळेगाव दाभाडे (दै. आरंभ पर्व)

मावळ तालुक्यात अवकाळी पावसाने तडाखा दिल्याने कापणीस तयार असलेल्या खरीप भात पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. हाता-तोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतल्याने भात उत्पादक शेतकऱ्यांवर निराशेचे सावट पसरले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून तालुक्याच्या सर्वच भागांत अवकाळी पावसाचा तडाखा बसत आहे. मावळ तालुका खरीप भात पिकाचे आगार म्हणून ओळखला जात असून, तालुक्यात सुमारे १३ हजार हेक्टर क्षेत्रावर भात लागवड करण्यात आली आहे. यंदा पावसाने सुरुवातीलाच ताण दिल्याने लागवडीस सुमारे महिनाभर उशीर झाला होता. मात्र, जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांत मान्सूनच्या पावसाने जोरदार हजेरी लावून सुरुवातीची कसर भरून काढली. त्यामुळे भातपीक सावरून जोमात आले होते. यंदा भात पिकाला बऱ्यापैकी पाऊस



झाल्याने शेतकरी समाधानी होते. मात्र, भाताच्या दाणे भरण्याच्या अखेरच्या टप्प्यात पावसाने पुन्हा ताण दिल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. सध्या भातपीक काढणीस पूर्णपणे तयार असून, काही शेतकऱ्यांनी कापणीच्या कामाला सुरुवातही केली आहे. अशातच अवकाळी पावसाने अचानक तडाखा दिल्याने उभे भातपीक तसेच कापणी करून शेतात ठेवलेले पीक भिजले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या मेहनतीने पिकवलेल्या भाताचे नुकसान होत असून, शेतकऱ्यांवर दुःखाचे सावट आले आहे. दरम्यान, मावळ तालुका कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी मारुती साळे यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ कृषी अधिकारी आणि सहाय्यक कृषी अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी करत आहेत. काही भागांत पावसाचा जोर अधिक असल्याने उभ्या पिकांसह कापलेल्या भाताचेही नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी खाचरांमध्ये पाणी साचल्याने भाताचा पेंढा आणि जनावरांचा चारा भिजत आहे. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण होण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या भागांतील उभ्या आणि कापलेल्या भात पिकाचे नुकसान होत असल्याचे सहाय्यक कृषी अधिकारी अक्षय ढुमणे यांनी सांगितले.

'आई' विषयावर भव्य राज्यस्तरीय ऑनलाइन काव्यस्पर्धा

- "आम्ही भारताचे लोक" चळवळीतर्फे आयोजन
- १० नोव्हेंबर २०२६ ही अंतिम मुदत!

दौंड (दै. आरंभ पर्व)

"आम्ही भारताचे लोक" आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीच्या वतीने स्मृतीशेष कमलबाई बळीराम सोनवणे यांच्या स्मृतीदिनानिमित्त (मृत्यू दिनांक: १०-११-२०२१) एका भव्य राज्यस्तरीय ऑनलाइन काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा मुख्य विषय "आई" हा असून ही स्पर्धा सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी पूर्णपणे निःशुल्क आहे. स्पर्धेत सहभागी होणारी कविता स्वरचित असावी; AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) च्या मदतीने तयार केलेली कविता स्वीकारली जाणार नाही. स्पर्धेतून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांक काढले जाणार असून स्मृतीशेष कमलबाई बळीराम सोनवणे यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव आयु. अंकुश बळीराम सोनवणे यांच्यातर्फे विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. तसेच निवडक उत्कृष्ट ५० कवितांचा एक प्रतिनिधिक काव्यसंग्रह "आम्ही भारताचे लोक" या प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित केला जाणार आहे. कविता ऑनलाईन व्हाट्सॲपवर पाठवताना मेसेजमध्ये "स्पर्धेसाठी" असा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक असून कविता पाठवण्याची अंतिम मुदत १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत आहे. या उपक्रमाचे आयोजन आंबेडकरी सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने करण्यात आल्याची माहिती चळवळीचे मुख्य समन्वयक संदेश कर्डक यांनी दिली. अधिक माहिती व कविता पाठवण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अविनाश मनवर (9699500275), सुनंदा साखळे (9820276312), वैशाली ढेठे (7709912597) यांच्याशी संपर्क साधता येईल. तसेच स्पर्धेकरिता रिता रामटेके (7841856636), स्वाती चव्हाण (7066375005) आणि अंकुश सोनवणे (9503446938) संघशिल भद्रे (9881127003) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



ग्रामीण भागातील खेळाडूंची अडथळा शर्यतीत दमदार कामगिरी!

- प्रणाली हिंगे, साहिल घुळेकर यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड
- पुणे विभागीय मैदानी क्रीडा स्पर्धेत ग्रामीण खेळाडूंचा डंका
- प्रणाली आणि साहिल यांना द्वितीय क्रमांक, तर आर्या हिंगेची तृतीय क्रमांकाची कमाई

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर ग्रामीण भागातील खेळाडूही क्रीडा क्षेत्रात मोठी भरारी घेऊ शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत आयोजित पुणे विभागस्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत यशाचा झेंडा फडकविला. प्रणाली हिंगे आणि साहिल घुळेकर यांनी अडथळा शर्यतीत द्वितीय क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले, तर आर्या योगेश हिंगे हिने २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. या स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या १०० मीटर अडथळा शर्यतीत प्रणाली हिंगे हिने द्वितीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे १९ वर्षाखालील मुलांच्या ४०० मीटर अडथळा शर्यतीत साहिल घुळेकर याने द्वितीय क्रमांक मिळविला. या दोन्ही खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

एल्सटॉमच्या प्रगत मेट्रोपोलिस मेट्रो गाड्या सेवेत दाखल



पुणे (आरंभ पर्व) : स्मार्ट आणि शाश्वत गतिशीलता क्षेत्रातील जागतिक अग्रणी कंपनी एल्सटॉमने आज पुणे मेट्रो लाइन 3 वरील प्रवासी सेवांच्या प्रारंभाचा आनंद साजरा केला. भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आलेल्या, हिंजवडी आयटी हब ते शिवाजीनगर या 23.3 किमी लांबीच्या उन्नत मार्गिकेवर 23 स्थानके आहेत. या मार्गावर पुणेकरांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि जागतिक दर्जाचा प्रवासाचा अनुभव देण्यासाठी एल्सटॉमच्या प्रगत मेट्रोपोलिस मेट्रो ट्रेनसेट्सची नियुक्ती करण्यात आली आहे. हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी मॉडेलद्वारे राबविण्यात येत असून, 22 मेट्रोपोलिस ट्रेनसेट्सच्या पुरवठ्याची जबाबदारी एल्सटॉमकडे आहे. उच्च क्षमतेचा सार्वजनिक वाहतूक दुवा उभारल्यामुळे हा टप्पा शहरी संपर्कक्षमता मोठ्या प्रमाणात वाढवेल आणि हजारो प्रवाशांना दररोज भेडसावणारी वाहतूक कोंडी कमी करण्यास मदत करेल, अशी अपेक्षा आहे.

सामाजिक कार्यासाठी क्रॉम्प्टन महात्मा अवॉर्ड २०२६ ने सन्मानित



पुणे (आरंभ पर्व) : क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (क्रॉम्प्टन) ला, त्यांच्या क्रॉम्प्टन सीएसआर फाऊंडेशन (सीसीएफ) द्वारे सकारात्मक सामाजिक बदल घडवून आणण्याच्या प्रयत्नांसाठी, 'कम्युनिटी इनिशिएटिव्हज' प्रकारात महात्मा अवॉर्ड २०२६ ने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार लाइव्हवीक ग्रुपद्वारे आयोजित महात्मा फाऊंडेशनचा एक उपक्रम आहे. 'प्रोजेक्ट जल जीवन' द्वारे जल सुरक्षा आणि ग्रामीण भागातील उपजीविका सशक्त करणे आणि 'प्रोजेक्ट सक्षम' द्वारे महिलांना तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करण्यासाठी संधी देणे, या फाऊंडेशनच्या कामांची या पुरस्कारामुळे दखल घेतली गेली आहे. समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सीसीएफने केलेले सातत्यपूर्ण उपक्रम, स्थानिक भागीदारी आणि त्यामुळे मिळालेले मोजता येण्याजोगे परिणाम यांची हा पुरस्काराने दखल घेतो. या उपक्रमांमध्ये जलसंधारण, कौशल्य विकास, शिक्षण आणि सामाजिक काळजी यांचा समावेश आहे जे समाजाला सक्षम बनवणे आणि शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे यावर विशेष लक्ष केंद्रित करतात. 'प्रोजेक्ट जल जीवन' महाराष्ट्रातील अहिल्यानगर आणि राजस्थानमधील सिरोही आणि पाली येथील पाण्याची समस्या सोडवत आहे.

जागतिक फार्मासिस्ट दिन व राष्ट्रीय फार्मसी सप्ताहाचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : औषधांचा सुरक्षित आणि योग्य वापर, रुग्णसेवेतील फार्मासिस्टचे महत्त्वपूर्ण योगदान तसेच प्रतिजैविक प्रतिकार शक्तीच्या वाढत्या समस्येबाबत समाजात जनजागृती करण्याच्या उद्देशाने फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि इंद्रायणी विद्या मंदिर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक फार्मासिस्ट दिन व राष्ट्रीय फार्मसी सप्ताह २०२६ साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पश्चिम महाराष्ट्र व मुंबई विभागाचा राज्यस्तरीय कार्यक्रम बुधवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेच्या कृष्णराव भेगडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च येथे आयोजित करण्यात आला आहे. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. मोंटुकुमार पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, संस्थेचे अध्यक्ष रामदास काकडे यांनी ही माहिती दिली.

उद्योग व अर्थव्यवस्थेच्या प्रगतीमध्ये सीएचे योगदान मोलाचे

सीए अनुज गोयल यांचे प्रतिपादन; 'आयसीएआय'तर्फे 'सीएफओ फोरम एलिव्हेट २.०'चे आयोजन



पुणे (दै. आरंभ पर्व)

"भारतीय अर्थव्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी सनदी लेखापाल महत्त्वाचे योगदान देतातच; पण अलिकडच्या काळात जागतिक अर्थव्यवस्थेतही ते महत्त्वाचे योगदान देत आहेत. भारतातील एक लाखांहून अधिक सीए जागतिक अर्थव्यवस्थेसाठी कार्यरत आहेत, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे," असे प्रतिपादन 'आयसीएआय'च्या मेंबर्स इन इंडस्ट्री अँड बिझनेस कमिटीचे अध्यक्ष सीए डॉ. अनुज गोयल यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटन्ट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) कमिटी फॉर मेम्बर्स इन इंडस्ट्री अँड बिझनेस (सीएमआयबी), 'आयसीएआय' पुणे शाखा व झी बिझनेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आयसीएआय सीएफओ फोरम एलेव्हेट २.०'मध्ये ते बोलत होते. पुणे स्टेशनजवळील हॉटेल ग्रँड शेरेटॉन येथे झालेल्या कार्यक्रमावेळी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, 'सीएमआयबी'च्या उपाध्यक्ष सीए प्रिती सावला, विभागीय समिती सदस्य सीए अभिषेक धामणे, आयसीएआय पुणे शाखेचे अध्यक्ष सीए प्रणव आपटे, उपाध्यक्ष सीए निलेश येवलेकर, सचिव सीए नेहा फडके, खजिनदार सीए नंदकुमार कदम, 'विकासा' अध्यक्षा सीए सारिका दिंडोकार, कार्यकारिणी सदस्य सीए सचिन मिनीयार, सीए प्रज्ञा बंब आदी उपस्थित होते.

सीए अनुज गोयल म्हणाले, "कंपनीचा मुख्य वित्त अधिकारी म्हणून काम करत असताना तुमच्याकडे केवळ पदवी किंवा पुस्तकी ज्ञान असून उपयोग नसतो. तर इंडस्ट्रीमध्ये काम करण्यासाठी तुमच्याकडे काही किमान कौशल्येही असणे आवश्यक असते. उद्योग आणि व्यवसायात सक्रियपणे काम करणाऱ्या सनदी लेखापालांमुळे भारतीय अर्थव्यवस्था आणि उद्योगांचे अर्थकारण स्थिर होत असून, ते प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारतीय सीए कौशल्याधारित व प्रात्यक्षिक शिक्षण घेत असल्याने त्यांचे विशेष महत्व आहे." सीए चंद्रशेखर चितळे म्हणाले, "गेल्या काही वर्षात बाह्य वातावरण मोठ्या प्रमाणात बदलत आहे. त्यामुळे काम करताना अंतर्गत अडचणींपेक्षा बाह्य अडचणी वाढत आहेत. जागतिक स्तरावरील अर्थिक बदलांचा विचार करता भारतीय सीए दर्जेदार सेवा देण्याचा कायम प्रयत्न करतात." आयसीएआयतर्फे नव्याने सीए होत असलेले विद्यार्थी आणि सभासदांसाठी आपण विविध कार्यक्रम, तसेच प्रशिक्षण कार्यशाळा घेत असल्याचेही चितळे यांनी नमूद केले.

सीए प्रिती सावला म्हणाल्या, "पुणे हे शिक्षण, आयटी आणि व्यवसायाचे हब आहे. पुण्यातील सीएंची संख्या लक्षणीय असून पूर्वी सीएचे काम हे केवळ ऑडीटपुरतेच मर्यादित होते. आता मात्र सीए इन्व्हेस्टमेंट बँकींग, रिसर्च अनालिस्ट, अकाऊंटींग अशा सगळ्याच गोष्टी पाहतात. त्यामुळे सीएचा रोल गेल्या काही वर्षात बदलला आहे. सीए हे अर्थव्यवस्थेचा कणा असल्यामुळे सीएने कामातील नैतिकता आणि प्रामाणिकता जपायला हवी."

'बदलत्या जागतिक परिस्थितीत भारताचा आर्थिक दृष्टिकोन आणि कॉर्पोरेट इंडियामध्ये त्याचा उपयोग' या विषयावर पिरामल एंटरप्रायजेस लिमिटेडचे देबोपाम चौधरी यांनी विचार मांडले. तर 'गुंतवणूकदारांसाठी शेअर बाजाराची भविष्यातील वाटचाल' या विषयावर सेठी फिनमार्टचे व्यवस्थापकीय संचालक विकास सेठी आपले विचार मांडले.

सीए प्रणव आपटे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनामागील संकल्पना, तसेच पुणे शाखेच्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. गीतांजली माथुर व सौरभ मानचंदा यांनी सूत्रसंचालन केले. सीए नेहा फडके यांनी आभार मानले.

मृत्यूनंतरही जीवनदान देणाऱ्या कुटुंबांचा होणार सन्मान!

- मुंबईत २८ नोव्हेंबरला 'जीवनदाता परिवार सन्मान २०२६'
- अवयवदानातून अनेकांना मिळाले नवजीवन
- दात्यांच्या कुटुंबीयांसह जनजागृती करणारे सामाजिक कार्यकर्ते आणि वैद्यकीय क्षेत्रातील सेवाव्रतींचा गौरव

मुंबई (दै. आरंभ पर्व)

एखाद्या प्रिय व्यक्तीच्या निधनाचे दुःख असह्य असते. मात्र, याच दुःखाच्या क्षणी अवयवदानाचा निर्णय घेऊन दुसऱ्याच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण करणारी कुटुंबे खऱ्या अर्थाने माणुसकीचा आदर्श घालून देतात. मृत्यूनंतरही आपल्या प्रिय व्यक्तीच्या माध्यमातून इतरांना जीवनदान देणाऱ्या अशा संवेदनशील कुटुंबांच्या त्यागाचा आणि धैर्याचा गौरव करण्यासाठी इंडिया २०३० या सामाजिक विकास संस्थेच्या वतीने येत्या २८ नोव्हेंबर रोजी मुंबईत 'जीवनदाता परिवार सन्मान २०२६' या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून अवयवदान करणाऱ्या कुटुंबांचा सन्मान करण्याबरोबरच अवयवदानाबाबत समाजात जनजागृती करणाऱ्या व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते तसेच अवयवदान आणि अवयव प्रत्यारोपण प्रक्रियेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या डॉक्टर, सर्जन आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात येणार आहे. या सन्मान सोहळ्यात तीन प्रमुख श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

रोहित शर्मासोबत आता आपल्या प्रियजनांना द्या खास दिवाळी शुभेच्छा!

- रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरची अनोखी सणासुदीची मोहीम
- AI तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वैयक्तिक व्हिडिओ संदेश तयार करण्याची संधी



पुणे (दै. आरंभ पर्व)

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह, आपुलकी आणि नात्यांचा सण! प्रत्येक सण अविस्मरणीय बनवण्यात काही व्यक्तींचा मोठा वाटा असतो. अशाच खास व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी सिग्रामच्या रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने अनोखी सणासुदीची मोहीम सुरू केली आहे. 'या सणासुदीच्या काळात, प्रत्येकातील मोठेपणाचा आनंद साजरा करूया' ही या मोहिमेची मध्यवर्ती संकल्पना आहे. क्रिकेटचा सुपरस्टार रोहित शर्मा, अभिनेता आणि विनोदी कलाकार राहुल दुआ तसेच अभिनेत्री मानवी गग्रू यांच्या सहभागातून ही मोहीम अधिक आकर्षक बनविण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि भावनिक नात्यांची सांगड घालत ग्राहकांना आपल्या प्रियजनांसाठी खास शुभेच्छा तयार करण्याची संधी या माध्यमातून मिळणार आहे.

या मोहिमेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) तंत्रज्ञानाचा अभिनव वापर. ग्राहकांना आपल्या मित्रपरिवारातील किंवा कुटुंबातील खास व्यक्तींसाठी क्रिकेटपटू रोहित शर्मा आणि स्वतःचा समावेश असलेला वैयक्तिक सणासुदीचा व्हिडिओ संदेश तयार करता येणार आहे. यासाठी ग्राहकांना royalstagliveitlarge.com या वेबसाइटला भेट द्यावी लागणार आहे. या डिजिटल उपक्रमातून आपल्या प्रियजनांना त्यांच्या खास गुणांची जाणीव करून देणारा आणि त्यांच्याविषयीचे प्रेम व्यक्त करणारा अनोखा व्हिडिओ तयार करता येईल.

या मोहिमेच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीतील वेगळेपण अधोरेखित करण्यात आले आहे. मित्रपरिवाराला एकत्र आणणारा मित्र, प्रत्येक कार्यक्रमात नृत्याची सुरुवात करणारा नातेवाईक किंवा आपल्या विनोदांनी सर्वांना हसवणारा सहकारी अशा व्यक्तींमुळेच प्रत्येक सणाचा आनंद द्विगुणित होतो. या व्यक्तींचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांना खास असल्याची जाणीव करून देण्यासाठी ही मोहीम आखण्यात आली आहे.

पर्नोड रिकार्ड इंडियाच्या मुख्य विपणन अधिकारी देबश्री दासगुप्ता म्हणाल्या, "उत्सव किती भव्य होता यापेक्षा तो खास बनवणाऱ्या व्यक्तींमुळेच अधिक काळ लक्षात राहतो. रॉयल स्टॅगने अनेक वर्षांपासून #CelebrateLarge या विचारातून लोकांना प्रेरित केले आहे. यंदा जनरेटिव्ह AI तंत्रज्ञानाच्या माध्यमातून या विचाराला अधिक वैयक्तिक स्वरूप देण्यात आले आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने लोकांना आपल्या प्रियजनांविषयीचे प्रेम आणि कौतुक अनोख्या पद्धतीने व्यक्त करता येणार आहे."

खास व्हिडिओ आणि वेबसाइट :
वैयक्तिक शुभेच्छा तयार करण्यासाठी : https://royalstagliveitlarge.com/
मोहिमेचा व्हिडिओ : https://www.youtube.com/watch?v=VKgatEwEx7E

बोगस दस्तऐवजांच्या आधारे 'SRA'ची फसवणूक

विकसकावर गुन्हे दाखल करण्यासाठी येरवड्यातील नागरिकांचा झोपुप्रा कार्यालयावर भव्य 'निषेध महामोर्चा'



पुणे (दै. आरंभ पर्व)

जाधवनगर, येरवडा येथील नियोजित झोपडपट्टी पुनर्वसन (SRA) प्रकल्पात विकसकाकडून (मे. पश्चिम बिल्डर्स) झालेल्या कथित फसवणुकीच्या आणि बोगस दस्तऐवजांच्या विरोधात आज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयावर प्रचंड निषेध महामोर्चा धडकला रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी व जाधवनगर एस. आर. ए. विरोधी कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते . २०० हून अधिक स्त्री-पुरुष नागरिकांचा सहभाग असलेल्या या मोर्चाने गणेशखिंड रोडवरील काकडे मॉल परिसर दणाणून सोडला होता. या आंदोलनादरम्यान रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे नेते राहुल डंबाळे यांनी एसआरएच्या नियमावलीतील अत्यंत महत्त्वाच्या व जाचक मुद्द्याकडे शासनाचे लक्ष वेधले . "सध्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांसाठी लागू करण्यात आलेली ५१ टक्के संमतीची अट ही विकसकांच्या फायद्याची असून यामुळे मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत आहेत. त्यामुळे ही ५१ टक्क्यांची अट तात्काळ रद्द करण्यात यावी आणि ती पूर्वीप्रमाणे ७० टक्के संमतीची करण्यात यावी," अशी आग्रही मागणी राहुल डंबाळे यांनी केली. विकसकावर तातडीने फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, या मागणीवर कृती समिती ठाम असून सुनावणीत न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला. त्यानंतर उपस्थितांना संबोधित करताना ज्येष्ठ नेते व माजी नगरसेवक ॲड. आयुब शेख यांनी प्रशासनाला तीव्र शब्दांत धारेवर धरले. "गोरगरीब झोपडीधारकांचे बोगस दस्तऐवज आणि बनावट संमत्या सादर करून प्राधिकरणाची दिशाभूल करणाऱ्या विकसकाची गय केली जाणार नाही. येरवड्यातील नागरिकांवर अन्यायकारक पद्धतीने लादला जाणारा हा एसआरए प्रकल्प आम्ही कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही," असा स्पष्ट आणि आक्रमक इशारा ॲड. आयुब शेख यांनी प्रशासनाला दिला. या आंदोलनाप्रसंगी उपस्थित स्थानिक सुहास टिंगरे व रवी टिंगरे यांनी नागरिकांच्या मागणीला जाहीर पाठिंबा दिला. "गोरगरीब झोपडपट्टी धारकांवर कोणत्याही स्वरूपाचा अन्याय होऊ न देण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही सर्व तऱ्हेचे प्रयत्न करू," असे सांगत त्यांनी स्थानिक रहिवाशांना खंबीरपणे आश्वस्त केले. मोर्चाच्या तीव्रतेची आणि नागरिकांच्या भावनांची कदर करत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या सचिव शीतल निकम यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. जाधवनगर येथील वादग्रस्त स्कीम संदर्भात सध्या प्रशासनाकडून सुरू असलेले सर्वेक्षणाचे काम हे तातडीने स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा अपर्णा यादव यांनी केली. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सत्यता तपासण्यासाठी पुढील आठवड्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) व झोपडपट्टी धारक यांची एक संयुक्त सुनावणी पार पडेल आणि या सुनावणीनंतरच पुढील कोणतीही प्रक्रिया सुरू राहील, असे ठोस आश्वासन त्यांनी आंदोलनकर्त्यांना दिली. प्रशासनाच्या या निर्णयामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



जमनालाल बजाज यांना कुटुंबीयांची अनोखी श्रद्धांजली!

- १३७ व्या जयंतीनिमित्त बजाज कुटुंबाच्या तीन पिढ्यांचा विशेष उपक्रम
- ऐतिहासिक आठवणी आणि प्रेरणादायी कार्याचा फिल्ममधून जागर

मुंबई (दै. आरंभ पर्व)

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देणारे, दूरदृष्टीचे उद्योगपती आणि समाजसेवेचा आदर्श निर्माण करणारे बजाज समूहाचे संस्थापक श्री जमनालाल बजाज यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त बजाज कुटुंबीयांनी विशेष श्रद्धांजली फिल्म प्रदर्शित केली आहे. बजाज कुटुंबातील तिसरी, चौथी आणि पाचवी पिढी एकत्र येत आपल्या संस्थापकांच्या विचारांना आणि कार्याला या विशेष फिल्मच्या माध्यमातून अभिवादन केले आहे. श्री शिशिर बजाज यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आलेली ही श्रद्धांजली फिल्म बजाज समूहाच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर प्रदर्शित करण्यात आली आहे. स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, औद्योगिक विकास, सामाजिक परिवर्तन आणि राष्ट्रहितासाठी केलेले कार्य अशा विविध पैलूंवर या फिल्ममध्ये प्रकाश टाकण्यात आला आहे. जमनालाल बजाज हे महात्मा गांधी यांचे अत्यंत जवळचे सहकारी होते. गांधीजी त्यांना प्रेमाने आपला 'पाचवा मुलगा' म्हणत असत.

स्वदेशी, खादी, महिला सक्षमीकरण, सामाजिक समानता आणि आर्थिक स्वावलंबन या मूल्यांचा त्यांनी आयुष्यभर पुरस्कार केला. या विशेष फिल्ममध्ये महात्मा गांधी आणि स्वातंत्र्यलढ्यातील प्रमुख नेत्यांसोबतचे जमनालालजी यांचे संबंध, त्यांचे सामाजिक कार्य तसेच वर्ध्यातील ऐतिहासिक बजाजवाडीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात देशातील प्रमुख नेत्यांच्या बैठका आणि विचारविनिमयाचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून बजाजवाडीने भूमिका बजावली होती.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

आपल्या जाहिरातींसाठी
विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व
सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती
आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये –
विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.

आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी



आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यत पोहोचवण्यासाठी
आजच संपर्क साधा!

संपर्क :

प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल :
aparvinfo@gmail.com

दैनिक आरंभ पर्व | "आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र"

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार
NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!

आपणही बना आमच्या टीमचा भाग !

महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक. पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! समाजाचा आवाज बना!

आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!

दै. आरंभ पर्वला
जाहिरात देऊन तर पहा..!

आपल्या व्यवसायाची भरारी,
आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा दैनिक आरंभ पर्व.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



आपल्या यशाची सुरुवात
योग्य प्रसिद्धीपासून...!

आजच जाहिरात द्या आणि
आपल्या व्यवसायाला
द्या नवी ओळख..!

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात,
उद्याची यशोगाथा..!